Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादकः मुकुंदराव शामराव नंन्नवरे

एसटी ही महाराष्ट्राची लोकवाहिनी (पान २ वर)





। गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक १८ । पाने २ ।

DIGITAL EDITION


# टीएमसीला पराभूत करण्याच्या बाबतीत बंगालची जनता भाजप कार्यकर्त्यांपेक्षा पुढे

## गृहमंत्री अमित शाहच्या मोठ्या दाव्याने खळबळ, निवडणूक हरणार 'दीदी', सत्तेवर BJP

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** गुरुवार, २३ एप्रिल २०२६ रोजी पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या पहिल्या टप्प्यातील मतदानाच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर निशाणा साधला आहे. दक्षिण २४ परगणा येथे एबीपी न्यूजशी झालेल्या विशेष संभाषणात गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, टीएमसीला पराभूत करण्याच्या बाबतीत बंगालची जनता भाजप कार्यकर्त्यांपेक्षा पुढे आहे. `शामध्ये विविध निवडणुकांमध्ये भाजपने आपली सत्ता कायम राखली आहे आणि पश्चिम बंगालमध्ये होणारी ही निवडणूक भाजपासाठी नक्कीच महत्त्वाची आहे. भाजप पश्चिम बंगालमध्ये पाऊल रोवेल अशी पूर्ण अपेक्षा अमित शाह यांना आहे आणि याशिवाय ममता दीदी हरणार असल्याचा दावाही त्यांनी यावेळी केलाय. बंगालमधील सुरक्षा मुद्द्यावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. टीएमसी सातत्याने भाजप आणि निवडणूक आयोगावर साटेलोट्याचे आरोप करत आहे. अमित शाह म्हणाले, "तामिळनाडूमध्ये आमचे विरोधी पक्षाचे सरकार आहे, पण तिथे हा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला नाही. केरळमध्येही आमचे विरोधी पक्षाचे सरकार आहे, पण कोणतेही आरोप करण्यात आलेले नाहीत. आसाममध्ये काँग्रेसने आमच्यावर कोणतेही आरोप केलेले नाहीत. फक्त ममता बॅनर्जी अस्वस्थ झाल्या





आहेत आणि आरोप करत आहेत." ते म्हणाले, "ममता बॅनर्जी जनतेचा आवाज ऐकू शकत नाहीत. मी त्यांना बंगालच्या जनतेचा आवाज ऐकवत आहे. त्या जरा जास्तच लक्ष देऊन ऐकतात, म्हणून मी त्यांना कान उघडे ठेवून ऐकायला सांगितले. त्यात काय चुकीचे आहे? प्रत्येकाने कान उघडे ठेवून ऐकले पाहिजे." ममता बॅनर्जी आपला पराभव पाहत आहेत. सरकार स्थापन झाल्यावर घुसखोरांना रोखणे आणि त्यांना हटवणे हे आमचे प्राधान्य असेल, असे ते म्हणाले.यावेळी अमित शाह म्हणाले की, "घुसखोर या देशात राहू शकत नाहीत. आधार कार्ड देऊन, पंचायत नोंदणी करून, घुसखोर आल्यास त्यांना गावात राहण्याची परवानगी देऊन आणि सीमावर्ती भागात कुंपण घालण्यास परवानगी न देऊन ममता बॅनर्जी असे म्हणत आहेत की तुम्ही घुसखोरांना रोखू शकता. हे म्हणजे त्यांचे हात बांधून त्यांना समुद्रात फेकून देऊन पोहून जाण्यास सांगण्यासारखे आहे. असे होऊ शकत नाही. मला संपूर्ण देशातील मतदारांना सांगायचे आहे की, जेव्हा आम्ही त्रिपुरामध्ये आलो, तेव्हा तिथे घुसखोरी थांबली. जेव्हा आम्ही आसाममध्ये आलो, तेव्हा तिथेही ती थांबली. ५ मे रोजी बंगालमध्ये आमचे सरकार स्थापन होईल आणि घुसखोरी थांबेल.

### घुसखोर देशात राहू शकत नाहीत: शाह

बंगालमधील महिलांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर गृहमंत्री अमित शाह म्हणाले, "मुख्यमंत्री ममता बॅनर्जी स्वतः म्हणतात की महिलांनी संध्याकाळी ७ नंतर बाहेर जाऊ नये. मला माता आणि भगिनींना सांगायचे आहे की, ५ मे रोजी भाजपचे सरकार स्थापन झाल्यानंतर आम्ही महिलांना घटनात्मक अधिकार देऊ इच्छितो." `शामध्ये विविध निवडणुकांमध्ये भाजपने आपली सत्ता कायम राखली आहे आणि पश्चिम बंगालमध्ये होणारी ही निवडणूक भाजपासाठी नक्कीच महत्त्वाची आहे. भाजप पश्चिम बंगालमध्ये पाऊल रोवेल अशी पूर्ण अपेक्षा अमित शाह यांना आहे आणि याशिवाय ममता दीदी हरणार असल्याचा दावाही त्यांनी यावेळी केलाय. बंगालमधील सुरक्षा मुद्द्यावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. टीएमसी सातत्याने भाजप आणि निवडणूक आयोगावर साटेलोट्याचे आरोप करत आहे. अमित शाह म्हणाले, "तामिळनाडूमध्ये आमचे विरोधी पक्षाचे सरकार आहे, पण तिथे हा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला नाही. केरळमध्येही आमचे विरोधी पक्षाचे सरकार आहे, पण कोणतेही आरोप करण्यात आलेले नाहीत. आसाममध्ये काँग्रेसने आमच्यावर कोणतेही आरोप केलेले नाहीत. फक्त ममता बॅनर्जी अस्वस्थ झाल्या आहेत आणि आरोप करत आहेत.

Selected

### उकाड्याने हैराण पुण्यात अचानक पावसाचा वर्षाव

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून कडक ऊन आणि असह्य उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांना बुधवारी सायंकाळी पावसाने मोठा दिलासा दिला. दिवसभर अंगाची लाहीलाही करणाऱ्या उष्णतेनंतर, अचानक झालेल्या पावसाच्या सरींनी वातावरणात काहीसा गारवा निर्माण केला आहे.बुधवारी सकाळपासूनच पुण्यात सूर्य आग ओकत होता. घामाच्या धारा आणि वाढत्या तापमानामुळे नागरिक त्रस्त झाले होते. मात्र, सायंकाळी ४ च्या सुमारास वातावरणात अचानक नाट्यमय बदल झाला. आकाशात काळेकुट्ट ढग जमा झाले आणि काही वेळातच पावसाने हजेरी लावली. स्वारगेट, सारसबाग,पूल आणि मध्यवर्ती पेठांमधील काही भागात पावसाच्या मध्यम सरी बरसल्या.पावसाचे प्रमाण तसे तुरळक होते, तरीही अचानक आलेल्या या पावसामुळे रस्त्यावरून जाणाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. नोकरदार वर्ग आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित आश्रय शोधण्यासाठी कसरत करावी लागली. पावसामुळे रस्ते ओले झाल्याने दुचाकीस्वारांनाही जपून वाहन चालवावे लागले.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## जळगाव बाजार समितीच्या उत्पन्नात मोठी वाढ

### तीन वर्षांत कोट्यवधींची भर



जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** जळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने गेल्या तीन वर्षांत आर्थिक आघाडीवर उल्लेखनीय कामगिरी करत उत्पन्नात मोठी वाढ नोंदवली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, समितीने खर्च वजा जाता लाखो रुपयांचा नफा कमावला असून समितीची आर्थिक स्थिती भक्कम झाल्याची माहिती सभापती सुनील महाजन यांनी पत्रकार परिषदेत दिली. समितीच्या आकडेवारीनुसार, सन २०२३-२४ मध्ये ७ कोटी १८ लाख रुपये असलेले उत्पन्न सन २०२५-२६ मध्ये वाढून ९ कोटी ९५ लाख रुपयांवर पोहोचले आहे.

विशेष म्हणजे, २०२५-२६ या आर्थिक वर्षात सर्व खर्च वजा जाता ९१ लाख ३४ हजार २३५ रुपयांची निव्वळ शिल्लक राहिली आहे. मुख्य यार्डमधील भूखंड कराराचा २००८ पासून प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यास सुरुवात झाली आहे. एकूण २३५ अडते व व्यापाऱ्यांना नवीन नोंदणी करारनामे देण्यात येत असून, त्यापैकी ४० करारांचे नूतनीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरित प्रक्रिया लवकरच पूर्ण होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

#### कर्मचाऱ्यांसाठी दिलासा

समितीच्या प्रगतीत मोलाचा वाटा असलेल्या ७७ कर्मचाऱ्यांसाठी १ एप्रिल २०२६ पासून २७ टक्के महागाई भत्ता लागू करण्यात आला आहे. यामुळे कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होऊन कर्मचारी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. समितीच्या या सर्वांगीण प्रगतीमुळे शेतकरी व व्यापाऱ्यांमध्येही समाधान व्यक्त होत आहे.

यावेळी सभापती सुनील महाजन, सदस्य अशोक राठी, इंद्रराज सपकाळे, सचिव कैलास शिंदे, सुनील तापडिया, दीपक महाजन, मांगीलाल जैन, मोहन बडगुजर, राजेंद्र जोशी, विवेक जैन यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## जळगावात लेवा पाटीदार महासंघाच्या समुपदेशन केंद्राचे उद्घाटन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव:** कौटुंबिक कलह हा केवळ पती-पत्नीतील वादापुरता मर्यादित नसून शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी आणि सामाजिक ताणतणावाशी निगडित व्यापक विषय आहे, या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघाच्या समुपदेशन केंद्राचे उद्घाटन जळगावातील ओंकारनगर येथे उत्साहात पार पडले. दि. २२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता खान्देश शाखेच्या "कौटुंबिक कलह समुपदेशन केंद्र"चा छोटेखानी पण सुबक सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला समाजातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी महासंघाचे ज्येष्ठ सल्लागार तथा माजी नगराध्यक्ष बंडू काळे, अध्यक्ष अरुण बोरोले, खान्देश महिला उपाध्यक्षा सौ. नीता वराडे, कोशाध्यक्ष डॉ.



मिलिंद पाटील, जळगाव जिल्हा लेवा पाटीदार मंडळाचे अध्यक्ष लिलाधर चौधरी, डॉ. अॅड. सौ. ज्योती भोळे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. प्रास्ताविक करताना अध्यक्ष अरुण बोरोले यांनी समुपदेशन समितीची भूमिका स्पष्ट केली. कौटुंबिक वादांसोबतच शिक्षणातील अडचणी, आरोग्याच्या समस्या, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही हे केंद्र मार्गदर्शन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात एक वेगळा उपक्रम राबवत उपस्थितांमधून लकी ड्रॉ काढण्यात आला. त्यातून निवड झालेल्या शांताराम फेगडे यांच्या हस्ते समुपदेशन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या अनोख्या पद्धतीचे सर्वत्र कौतुक झाले. यावेळी बंडू काळे यांनी समुपदेशन समितीचे काम निःपक्षपणे आणि काटेकोरपणे पार पाडण्याची ग्वाही दिली. प्रत्येक प्रकरण समाजाभिमुख दृष्टिकोनातून हाताळले जाईल, असे त्यांनी नमूद केले. माजी जिल्हा परिषद आरोग्य सभापती कमलाकर रोटे यांनीही या उपक्रमाचे स्वागत करून सहकार्याचे आश्वासन दिले. समारंभाला लेवा पाटीदार समाजातील पदाधिकारी, सदस्य तसेच महिला-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मिलिंद पाटील यांनी केले.

## एमएचटी-सीईटीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश नोंदणीस विशेष मुदतवाढ!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई:** अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व कृषी शिक्षण या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या एमएचटी सीईटीच्या पीसीएम व पीसीबी समूहाच्या दुसऱ्या संधीसाठी नोंदणी करण्यास राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) एक दिवसाची विशेष मुदतवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी दुसऱ्या संधीसाठी नोंदणी केली नाही, अशा विद्यार्थ्यांना २३ एप्रिल रोजी एक दिवस नोंदणी करण्याची संधी उपलब्ध करण्यात आली आहे. एमएचटी सीईटीच्या दुसऱ्या संधीसाठी नोंदणी न केलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी सीईटी कक्षाकडे प्रत्यक्ष भेट देऊन, ई-मेल आणि दूरध्वनीद्वारे नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्याची मागणी केली होती. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन सीईटी कक्षाने पीसीएम व पीसीबी समूहाच्या दुसऱ्या संधीच्या सीईटीसाठी विलंब शुल्कासह एक दिवसाची मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना २३ एप्रिल रोजी नावनोंदणी करता येणार आहे. दुसऱ्या संधीसाठी नोंदणी न केलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही अंतिम संधी असणार आहे. त्यामुळे त्यांनी तत्काळ नोंदणी करावी, असे आवाहन सीईटी कक्षाकडून करण्यात आले आहे. दुसऱ्या संधीसाठी ऑनलाईन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या http://www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.महाराष्ट्रातील एमएचटी सीईटीच्या (पीसीएम व पीसीबी) विद्यार्थ्यांना प्रथमच प्रवेश परीक्षेच्या दोन संधी दिल्या जात आहेत. आजपर्यंत या सीईटीसाठी दुसऱ्या संधीची नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४ लाख २६ हजार २८४ इतकी आहे. एमएचटी पीसीएम सीईटीच्या दुसऱ्या संधीसाठी ३ लाख १४ हजार ४७५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली, तर एमएचटी पीसीबी सीईटीच्या दुसऱ्या संधीसाठी १ लाख ११ हजार ८०९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.एमएचटी सीईटी पीसीएम पीसीबी समूहाच्या दुसऱ्या संधीच्या सीईटीसाठी यापूर्वी नोंदणी न केलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक विशेष बाब म्हणून १५ व १६ एप्रिल रोजी विशेष मुदतवाढ दिली होती. या विशेष मुदतवाढीला चांगला प्रतिसाद मिळाला. या दोन दिवसांत पीसीएम व पीसीबी समूहाच्या दुसऱ्या संधीच्या सीईटीसाठी २४ हजार ९३४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

## नशिराबाद एसबीआय एटीएममध्ये तीन दिवसांपासून अंधार!

### ग्राहकांची गैरसोय, सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** येथील भारतीय स्टेट बँक एसबीआय च्या एटीएम केंद्रात गेल्या तीन दिवसांपासून लाईट नसल्यामुळे ग्राहकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. एटीएम मशीन कार्यरत असले तरी रूममधील लाईट बंद असल्याने विशेषतः रात्रीच्या वेळी व्यवहार करताना नागरिकांना अक्षरशः अंधारातच पैसे काढावे लागत आहेत. नशिराबाद हे सुमारे ३० हजार लोकसंख्येचे मोठे गाव असताना, मुख्य बँकेच्या एटीएममध्ये साधी प्रकाशयोजना नसणे हे धक्कादायक असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पिन नंबर टाकताना तसेच पैसे मोजताना मोबाईलचा टॉर्च वापरण्याची वेळ ग्राहकांवर येत





असून, त्यामुळे सुरक्षेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. एटीएममध्ये कधी रोख रक्कम नसणे, तर आता सलग तीन दिवसांपासून अंधार अशी परिस्थिती निर्माण झाल्याने ग्राहकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. संबंधित बँक प्रशासनाने या किरकोळ वाटणाऱ्या पण अत्यंत महत्त्वाच्या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन लाईटची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.


जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## कोकणात तडाखा वाढणार; हवामान विभागाचा अंदाज!

### विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा; उष्ण आणि दमट वातावरण कुठे ?

जन सम्राट टाईम्स

**मुंबई:** राज्यात सध्या पश्चिमी विक्षोभाची स्थिती असून यामुळे मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकणातील काही भागात वादळी वाऱ्यांसह पावसाची तर काही भागात गारपिटीची नोंद होत आहे. तर विदर्भातील काही भागातील कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. दरम्यान, पुढील चार दिवसांत कोकण पट्ट्यातील कमाल तापमानात वाढ होईल, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. राज्यात सध्या एकाच वेळी पावसाळी हवामान आणि तीव्र उष्णतेचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. यामुळे राज्यात सध्या अस्थिर हवामान आहे. दरम्यान, पुण्यातील काही भागात बुधवारी गारपिटीसह पावसाची नोंद झाली. पुढील दोन ते तीन दिवस राज्यात पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली असून गुरुवारी दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग आदी भागांना हवामान विभागाकडून पावसासाठी 'यलो



अलर्ट' देण्यात आला आहे. तर गुरुवारी विदर्भात हवामान कोरडे राहील, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. पुढील चार दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने हळूहळू वाढ होईल, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. २३ ते २५ एप्रिलदरम्यान कोकण, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्याच्या अंतर्गत भागात कमाल तापमान ४१ ते ४३ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील, असा अंदाजही हवामान विभागाने वर्तविला आहे. तसेच या प्रदेशातील किमान तापमानात पुढील तीन दिवसांत २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. विदर्भात पारा ४१ ते ४३ अशांवर स्थिर असून गुरुवारी त्यात २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली असून पुढील काही दिवस विदर्भातील यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, आणि अकोला आदी भागात उष्णतेची लाटसदृश्य स्थिती राहील.

#### विदर्भात हवामान कोरडे राहील

दरम्यान, बुधवारी विदर्भातील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद वर्धा येथे झाली. येथे ४४ अंश सेल्सिअस इतके कमाल तापमान नोंदले गेले. तर अकोला ४३.७, अमरावती ४३.२, चंद्रपूर ४३, गडचिरोली ४३.६, नागपूर ४२.८, तर यवतमाळ येथे ४३ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

## राज्यातील पदविका विद्यार्थ्यांना जपानमध्ये रोजगाराची संधी!

जन सम्राट टाईम्स

**पुणे :** महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना परदेशी नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्य सरकारकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्यातच आता राज्य तंत्रशिक्षण मंडळातून (एमएसबीटीई) पदविका शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जर्मनी, जपान आणि रशिया या देशांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी पुढाकार घेतला आहे. पदविका शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या देशांच्या भाषांचे प्रशिक्षण देण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. या भाषा प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय कामकाज संस्कृतीशी जुळवून घेण्याची क्षमता, संवाद कौशल्ये आणि व्यावसायिक आत्मविश्वास वाढण्यास मदत होऊन परदेशातील रोजगाराच्या संधींमध्ये लक्षणीय वाढ होण्यास मदत होणार आहे.जर्मनी, जपान व रशिया यासारख्या देशांमध्ये कुशल मनुष्यबळाला मोठी मागणी आहे. राज्यातील पदविका विद्यार्थ्यांना तेथे रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे. पदविका शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भाषा प्रशिक्षण मिळावे यासाठी एमसबीटीईकडून कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीचे (सीआयआय) सहकार्य घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना भाषा कौशल्याचे ज्ञान मिळावे यासाठी सीआयआयच्या कौशल्य उत्कृष्टता केंद्रामार्फत 'महाराष्ट्र-जर्मनी-जपान कुशल कामगार गतिशीलता' हा उपक्रम एमएसबीटीईकडून राबविण्यात येणार आहे.

» Selected

## मतदान केंद्रांकडे साहित्य व कर्मचारी रवाना

बारामती :बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उद्या (दि. २३) मतदान होणार असून, त्यासाठी आवश्यक मतदान साहित्य व कर्मचारी आज संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना करण्यात आले. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे गोदाम, एमआयडीसी, बारामती येथून ही प्रक्रिया सुरळीत पार पडली. या अंतर्गत ४७८ मतदान केंद्रांसाठी ४७८ ईव्हीएम, ९५६ बॅलेट युनिट्स तसेच ४७८ व्हीव्हीपॅट यंत्रे ६० बंदिस्त मिनी टेम्पोद्वारे, क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सुरक्षितपणे मतदान केंद्रांवर पोहोचविण्यात आली. यंदा निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरण प्रक्रियेत बदल करण्यात आला आहे. तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्निल रावडे यांनी सांगितले की, यापूर्वीप्रमाणे मतदान पथकांना डिस्पॅच सेंटरवर न बोलावता, थेट त्यांच्या संबंधित मतदान केंद्रांवर जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. फॉर्म्स आणि इतर आवश्यक साहित्य थेट मतदान केंद्रांवर पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी संपूर्ण मतदारसंघ ६० झोनमध्ये विभागण्यात आला असून, झोनसाठी एक क्षेत्रीय अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे.

# एसटी ही महाराष्ट्राची लोकवाहिनी

## एसटी सेवा अधिक सक्षम करण्यासाठी विविध निर्णय

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** एसटी ही महाराष्ट्राची लोकवाहिनी असून ती अधिक गतिमान, सुरक्षित आणि आरामदायी करण्यासाठी राज्य सरकारने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या जिव्हाळ्याची ‘ एसटी ‘ लवकरच संपूर्ण कात टाकून नव्या रूपात जनतेसमोर येईल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.राज्यातील अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमधून मोफत प्रवासाची सुविधा दिली जाते. या सुविधेचा लाभ सुलभपणे घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात येणार असून, त्याचा शुभारंभ मंत्रालयातील पत्रकार कक्षात करण्यात आला.यावेळी सुप्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख, जनसंपर्क अधिकारी अभिजित भोसले, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दीपक भातुसे, खजिनदार विनोद राय तसेच अन्य पत्रकार उपस्थित होते. या प्रसंगी प्रताप सरनाईक आणि रितेश देशमुख यांच्या हस्ते वरिष्ठ पत्रकारांना स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना






### पत्रकारांना स्मार्ट कार्डचे वितरण

या सुविधेचा लाभ सुलभपणे घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात येणार असून, त्याचा शुभारंभ मंत्रालयातील पत्रकार कक्षात करण्यात आला.यावेळी सुप्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख, जनसंपर्क अधिकारी अभिजित भोसले, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दीपक भातुसे, खजिनदार विनोद राय तसेच अन्य पत्रकार उपस्थित होते. या प्रसंगी प्रताप सरनाईक आणि रितेश देशमुख यांच्या हस्ते वरिष्ठ पत्रकारांना स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना सरनाईक म्हणाले.

सरनाईक म्हणाले की, एसटी सेवा अधिक सक्षम करण्यासाठी विविध निर्णय राबवले जात आहेत. एसटीच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक बसेस समाविष्ट करण्यात येत असून, येत्या काही वर्षांत डिझेलवर चालणाऱ्या बस टप्प्याटप्प्याने बंद केल्या जातील. यामुळे पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळेल. तसेच, एसटी स्थानकांची स्वच्छता राखण्यासाठी खाजगी कंत्राटे देण्यात आली असून, दर चार तासांनी स्वच्छतागृहांची साफसफाई केली जाईल. बस स्थानकेही स्वच्छ व सुटसुटीत ठेवण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे लवकरच एसटीचा चेहरामोहरा पूर्णपणे बदललेला दिसेल, असेही त्यांनी नमूद केले.या सुविधेचा लाभ सुलभपणे घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात येणार असून, त्याचा शुभारंभ मंत्रालयातील पत्रकार कक्षात करण्यात आला.यावेळी सुप्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख, जनसंपर्क अधिकारी अभिजित भोसले, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दीपक भातुसे, खजिनदार विनोद राय तसेच अन्य पत्रकार उपस्थित होते. या प्रसंगी प्रताप सरनाईक आणि रितेश देशमुख यांच्या हस्ते वरिष्ठ पत्रकारांना स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना सरनाईक म्हणाले की, एसटी सेवा अधिक सक्षम करण्यासाठी विविध निर्णय राबवले जात आहेत. दरम्यान, एसटीचे ब्रँड अँम्बेसेडर म्हणून रितेश देशमुख आणि जेनेलिया देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही जबाबदारी स्वीकारल्याबद्दल सरनाईक यांनी दोघांचे आभार मानले. यावर बोलताना रितेश देशमुख यांनी सांगितले की, त्यांचे वडील आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी परिवहन खाते सांभाळले होते. एसटी हा त्यांच्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. त्यामुळे कोणतीही अपेक्षा न ठेवता आपण एसटीचे ब्रँड अँम्बेसेडर होण्याचा निर्णय घेतला, असे त्यांनी स्पष्ट केले.एसटी स्थानकांची स्वच्छता राखण्यासाठी खाजगी कंत्राटे देण्यात आली असून, दर चार तासांनी स्वच्छतागृहांची साफसफाई केली जाईल. बस स्थानकेही स्वच्छ व सुटसुटीत ठेवण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे लवकरच एसटीचा चेहरामोहरा पूर्णपणे बदललेला दिसेल, असेही त्यांनी नमूद केले.या सुविधेचा लाभ सुलभपणे घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात येणार असून, त्याचा शुभारंभ मंत्रालयातील पत्रकार कक्षात करण्यात आला.

### पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळेल

एसटीच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक बसेस समाविष्ट करण्यात येत असून, येत्या काही वर्षांत डिझेलवर चालणाऱ्या बस टप्प्याटप्प्याने बंद केल्या जातील. यामुळे पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळेल. तसेच, एसटी स्थानकांची स्वच्छता राखण्यासाठी खाजगी कंत्राटे देण्यात आली असून, दर चार तासांनी स्वच्छतागृहांची साफसफाई केली जाईल. त्यामुळे लवकरच एसटीचा चेहरामोहरा पूर्णपणे बदललेला दिसेल, असेही त्यांनी नमूद केले.या सुविधेचा लाभ सुलभपणे घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात येणार असून, त्याचा शुभारंभ मंत्रालयातील पत्रकार कक्षात करण्यात आला.यावेळी सुप्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख, एसटी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दीपक भातुसे, खजिनदार विनोद राय तसेच अन्य पत्रकार उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स विशेष बातमी ज

# सौरऊर्जा ग्राहकांना आणखी एक ‘झटका’

## आता वीज शुल्क करही द्यावा लागणार

जन सम्राट टाईम्स

मुंबई: पर्यायी ऊर्जा म्हणून सौर ऊर्जेकडे वळलेल्या नागरिकांना आता राज्य सरकारने मोठा धक्का दिला आहे. सोलर रूफटॉप वापरणाऱ्या ग्राहकांकडून आता इलेक्ट्रिसिटी ड्युटी (वीज शुल्क) वसूल करण्याची तयारी सरकारने सुरू केली असून, यासाठी एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे.‘बिहाइंड द मीटर’ ग्राहकही रडारवर : धक्कादायक म्हणजे, जे ग्राहक सोलरमधून मिळणारी वीज स्वतःच वापरतात आणि महावितरणच्या ग्रीडला जोडलेले नाहीत, त्यांनाही आता या शुल्काच्या कक्षेत आणले जाणार आहे. म्हणजेच, तुम्ही तुमची स्वतःची वीज बनवून वापरली तरी सरकारला कर द्यावा लागेल.राज्य सरकारच्या नवीन शासन निर्णयानुसार, आता सोलर पॅनेलद्वारे स्वतः वीज निर्मिती करणाऱ्या आणि ती वापरणाऱ्या ग्राहकांवरही कराचा बोजा पडणार आहे. ही समिती प्रामुख्याने स्वतःच्या वापरासाठी तयार केलेली वीज आणि ग्रीडला दिलेली वीज, यावर किती वीज शुल्क लावायचे, या दोन गोष्टींवर काम करणार आहे. समितीत सर्व सरकारी अधिकारीच आहेत. ज्यांना महसूल गोळा करायचा आहे, ते निष्पक्ष निर्णय कसे घेणार? यात स्वतंत्र तज्ज्ञांचा समावेश असायला



हवा होता, असे मत ऊर्जा तज्ज्ञ सुधीर बुधे यांनी मांडले. ‘बिहाइंड द मीटर’ ग्राहकही रडारवर : धक्कादायक म्हणजे, जे ग्राहक सोलरमधून मिळणारी वीज स्वतःच वापरतात आणि महावितरणच्या ग्रीडला जोडलेले नाहीत, त्यांनाही आता या शुल्काच्या कक्षेत आणले जाणार आहे. म्हणजेच, तुम्ही तुमची स्वतःची वीज बनवून वापरली तरी सरकारला कर द्यावा लागेल.राज्य सरकारच्या नवीन शासन निर्णयानुसार, आता सोलर पॅनेलद्वारे स्वतः वीज निर्मिती करणाऱ्या आणि ती वापरणाऱ्या ग्राहकांवरही कराचा बोजा पडणार आहे.

### उद्योगांना आधीच फटका

१० किलोवॉटपेक्षा जास्त क्षमतेच्या सोलर सिस्टमवर एलटी ग्राहकांसाठी १.१६ रुपये आणि एचटी ग्राहकांसाठी १.४२ प्रति युनिट शुल्क आकारले जात आहे. टीओडी नियमांत बदल केल्यामुळे उद्योगांच्या वीज बिलात देखील मोठी वाढ झाली आहे.


जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# राज्यात आरटीईअंतर्गत ४७ हजार प्रवेश!

## सर्वाधिक ५,०८३ प्रवेश पुण्यात

जन सम्राट टाईम्स

**पुणे :** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांसाठी सुरू असलेल्या प्रवेश प्रक्रियेला वेग आला असून, बुधवारी (दि. २२) सायंकाळपर्यंत राज्यात एकूण ४७ हजार ४२२ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. लवकरच हा आकडा ५० हजारांचा टप्पा पार करणार असल्याचे चित्र असून, पुणे जिल्हा सर्वाधिक ५,०८३ प्रवेशांसह राज्यात अव्वल ठरला आहे.पहिल्या प्रतीक्षा यादीसाठी प्रवेशाची अंतिम मुदत प्रशासनाकडून वाढवून ३० एप्रिलपर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे अद्याप प्रवेश न घेऊ शकलेल्या पालकांना दिलासा मिळाला असून, उर्वरित जागा भरण्याची शक्यता वाढली आहे. संकेतस्थळावरील आकडेवारीनुसार, पुण्यानंतर ठाणे (४,५६७), अहिल्यानगर (२,५६५), नागपूर (२,०१७) आणि मुंबई (१,९६७) या जिल्ह्यांचा क्रम लागतो. तर, सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वात कमी ११९ प्रवेश नोंदवले गेले आहेत. मोठ्या शहरांमध्ये प्रवेशाचा वेग तुलनेने जास्त असताना, काही ग्रामीण भागात अद्याप प्रतिसाद कमी असल्याचे दिसून येत आहे. यंदा राज्यातील ८,७०१ शाळांमध्ये




आरटीईअंतर्गत १ लाख १४ हजार ८२६ जागा उपलब्ध आहेत. या जागांसाठी तब्बल २ लाख ८९ हजार २८६ पालकांनी अर्ज केले होते.

### आश्वासन देऊन चार महिने उलटले

६ एप्रिल रोजी संगणकीय सोडत काढण्यात आली होती, तर १० एप्रिल रोजी निवड यादी जाहीर करण्यात आली. या यादीत सर्वसाधारण गटातील १ लाख ५ हजार २२९ आणि दिव्यांग गटातील ५८२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.मात्र, निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने हजारो जागा अद्याप रिक्त आहेत. कागदपत्रांची पूर्तता, शाळा निवडीतील बदल, तसेच वेळेअभावी काही पालकांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. परिणामी, प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी संधी निर्माण होत आहे.

# साहेबांचे आशीर्वाद माझ्यासाठी आणि बारामतीकरांसाठी लाखमोलाचे

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांचे भावूक ट्विट, प्रकृतीसाठीही केली प्रार्थना

जन सम्राट टाईम्स

**बारामती :** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या मतदानापूर्वी एक मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचेशरद पवार हे प्रकृती अस्वास्थ्यामुळे उद्या होणाऱ्या मतदानास उपस्थित राहू शकणार नाहीत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी ट्विट करत ही माहिती दिली असून, साहेबांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना केली आहे.सुनेत्रा पवार यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, "प्रकृती अस्वास्थ्यामुळे आदरणीय पवार साहेब बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या मतदानास उपस्थित राहू शकणार नाहीत. मात्र त्यांचे आशीर्वाद माझ्यासाठी आणि बारामतीकरांसाठी लाखमोलाचे आहेत." बारामतीसह देश आणि राज्याच्या विकासात शरद पवारांचे योगदान प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले.सुनेत्रा पवार यांनी पुढे म्हटले की, "आदरणीय साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आदरणीय दादांनीही विकासात्मक राजकारणाची समृद्ध परंपरा जपली आहे. साहेबांनी केलेल्या आवाहनाला बारामतीकर नक्कीच उत्स्फूर्त प्रतिसाद देतील आणि विकासाच्या विचारांची दिशा पुढेही कायम राहील. शरद पवारांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना करत सुनेत्रा पवारांनी बारामतीकरांच्या भावनांना साद घातली आहे. ऐन





मतदानाच्या तोंडावर शरद पवारांची अनुपस्थिती आणि सुनेत्रा पवारांचे हे ट्विट राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.सुनेत्रा पवार यांनी पुढे म्हटले की, "आदरणीय साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आदरणीय दादांनीही विकासात्मक राजकारणाची समृद्ध परंपरा जपली आहे. साहेबांनी केलेल्या आवाहनाला बारामतीकर नक्कीच उत्स्फूर्त प्रतिसाद देतील आणि विकासाच्या विचारांची दिशा पुढेही कायम राहील. शरद पवारांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना करत सुनेत्रा पवारांनी बारामतीकरांच्या भावनांना साद घातली आहे. ऐन मतदानाच्या तोंडावर शरद पवारांची अनुपस्थिती आणि सुनेत्रा पवारांचे हे ट्विट राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या मतदानापूर्वी एक मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचेशरद पवार हे प्रकृती अस्वास्थ्यामुळे उद्या होणाऱ्या मतदानास उपस्थित राहू शकणार नाहीत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी ट्विट करत ही माहिती दिली असून, साहेबांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना केली आहे.

### सुप्रिया सुळेंनी दिली महत्त्वाची माहिती

रुग्णालयातूनच शरद पवार यांनी बारामतीच्या जनतेसाठी सोशल मीडियावर एक अत्यंत भावूक पोस्ट लिहिली आहे. यात त्यांनी म्हटले आहे की, "1967 मध्ये लढवलेल्या माझ्या पहिल्या निवडणुकीपासून आजपर्यंत मी बारामती मतदारसंघात सातत्याने मतदानाचा हक्क बजावला आहे. मात्र, दुर्दैवाने प्रकृती बिघडल्यामुळे आणि डॉक्टरांच्या कडक सूचनांमुळे मला यावेळी मुंबईबाहेर जाता येणार नाही. अत्यंत मजबूरीपोटी आणि जड अंतःकरणाने मला मतदानापासून वंचित राहावे लागत आहे."ही पोटनिवडणूक महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते दिवंगत अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे होत आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी बारामतीकरांना एक मोठे आवाहन केले आहे.

# मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर दोन दिवस मेगाब्लॉक

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरून (एक्स्प्रेस वे) प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना देण्यात आली आहे. पुलाच्या दुरुस्ती व रंगकामाच्या कामासाठी 23 आणि 24 एप्रिल 2026 रोजी दुपारी 12 ते 3 या वेळेत प्रत्येकी तीन तासांचा मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या कालावधीत संबंधित दिशेची वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कडून देण्यात आली आहे. MSRDC च्या माहितीनुसार, 23 एप्रिल रोजी दुपारी 12 ते 3 या वेळेत मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहील. त्यानंतर 24 एप्रिल रोजी त्याच वेळेत पुण्याकडे येणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. डोंगरगाव/कुसगाव (कि.मी. 58/500) येथील पुलावर दुरुस्ती व रंगकामाची कामे करण्यात येणार असल्याने हा मेगाब्लॉक आवश्यक ठरला आहेप्रवाशांची गैरसोय कमी करण्यासाठी प्रशासनाकडून पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. 23 एप्रिल रोजी मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांना किवळे, देहूरोड आणि तळेगाव मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 वरून कुसगाव टोल प्लाझामार्गे वळवण्यात येणार आहे. तर 24 एप्रिल रोजी पुण्याकडे येणाऱ्या वाहनांना कुसगाव टोल प्लाझामार्गे राष्ट्रीय महामार्ग 48 वरून देहूरोड आणि किवळे मार्गे पुण्याकडे वळवण्यात येईल.या मेगाब्लॉकमुळे दुपारच्या वेळेत वाहतुकीवर ताण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहनचालकांनी आपला प्रवास वेळेआधी नियोजित करावा, तसेच शक्य असल्यास पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. विशेषतः उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रवास करताना पाणी व आवश्यक सुविधा सोबत ठेवण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.दरम्यान, प्रवासादरम्यान काही अडचण आल्यास मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग नियंत्रण कक्ष किंवा महामार्ग पोलीसयांच्याशी संपर्क साधता येईल. हा मेगाब्लॉक आवश्यक देखभाल आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने घेतला जात असून, भविष्यातील प्रवास अधिक सुरक्षित व सुरळीत करण्यासाठी ही कामे महत्त्वाची असल्याचे MSRDC कडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# साताऱ्यात रंगणार १५ वे विद्रोही साहित्य संमेलन

## डॉ. मिंझ यांच्या हस्ते होणार उद्घाटन



जन सम्राट टाईम्स

**सातारा :** नवी दिल्ली येथील प्रो. डॉ. सोनाझरिया मिंझ यांची सातारा येथे होणाऱ्या १५ व्या विद्रोही साहित्य संस्कृती संमेलनाच्या उद्घाटक म्हणून निवड करण्यात आली आहे. त्या जवाहरलाल नेहरु विद्यापीठाच्या प्राध्यापक, भारतीय शिक्षणतज्ज्ञ, गणितज्ञ आणि आदिवासी हक्कासाठी झगडणाऱ्या कार्यकर्त्या आहेत. विद्रोही सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्र आणि १५ वे विद्रोही साहित्य संस्कृती संमेलन संयोजन समितीनं उद्घाटक म्हणून एकमतानं प्रो डॉ सोनाझरिया मिंझ यांच्या नावाची निवड केल्याची माहिती विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे राष्ट्रीय समन्वय समितीचे मुख्य समन्वयक डॉ भारत पाटणकर व विद्रोही सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्रचे अध्यक्ष कॉ धनाजी गुरव यांनी दिली. सातारा येथे आगामी दि. ९ आणि १० मे रोजी १५ वे विद्रोही साहित्य संस्कृती संमेलन आयोजित करण्यात आलं आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या १२५ व्या जयंतीच्या निमित्तानं साताऱ्याच्या प्रतिसरकारला अभिवादन करण्यासाठी हे संमेलन आयोजित करण्यात आलं आहे. महाराष्ट्रातील लोकप्रिय शाहीर संभाजी भगत या संमेलनाचे अध्यक्ष आहेत. तर, ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे स्वागताध्यक्ष आहेत.या संमेलनाच्या उद्घाटक म्हणून नवी दिल्ली येथील प्रो डॉ सोनाझरिया मिंझ उपस्थित राहणार आहेत. त्या मूळच्या झारखंडमधील गुमला जिल्ह्यातील आहेत. मिंझ २००५ पासून जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली येथे स्कूल ऑफ कॉम्प्युटर अँड सिस्टीम्स सायन्स या विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ‘सिदो-कान्हू मुर्मू विद्यापीठाच्या’ कुलगुरू म्हणून यशस्वी कार्यकाळ पूर्ण केला आहे. ‘सिदो-कान्हू मुर्मू विद्यापीठाच्या कुलगुरु म्हणून प्रो डॉ सोनाझरिया मिंझ यांनी मे २०२० ते जून २०२३ मध्ये कुलगुरु म्हणून काम केलं.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

# लाडक्या बहिणींना आमिष दाखवत बचतगटातील 439 भगिनींना फसवले

## प्रशांत अडसूळ नावाच्या व्यक्तीने तब्बल 439 लाडक्या भागणीनींची फसवणूक केली

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** मिरजगाव कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथील व्यक्तीने तालुक्यातील गरजू व गरीब महिलांच्या भोळ्या भाबड्या लाडक्या बहींणीना स्वयंरोजगाराचे आमिष दाखवून जास्तीचे चार पैसे मिळतील व त्यांच्या प्रपंचाला कशाप्रकारे मदत होईल, असे सांगत बचतगटातील ४३९ लाडक्या बहिणींची ४ लाख ८२ हजार ९०० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. महिलांना गृह उद्योग निर्माण व्हावा यासाठी शासनाकडून अनेक चांगल्या योजना राबवल्या जात आहेत यातून महिला सक्षम होईल या उद्देशाने शासन स्तरावर गरजू व होतकरू महिलांना शिलाई मशीन पंचायत समिती कडून दिल्या जातात याचाच फायदा घेत येथील व्यक्तीने तुम्हाला शिलाई मशीन मिळवून देतो नावाखाली, प्रत्येक महिलेकडून ११०० रुपये जमा केले. मात्र, त्यानंतर राज कालावधी होऊन गेला तरी मशीन एकाही महिलेला दिली गेली नाही. आपली फसवणूक झाल्याचे या



लाभार्थी महिलांच्या निदर्शनास आल्याने या महिलांनी थेट कर्जत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार कर्जत पंचायत समितीच्या महिला बचत गट समुदाय व्यक्ती (सीआरपी) सरोज सुभाष सुतार यांनी कर्जत पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दिली. ११०० रुपयांत शिलाई मशीन देण्याचे आमिष सदर फसवेगिरी करणाऱ्या प्रवृत्तीच्या व्यक्तीने दाखवले. यामध्ये महिलांना फसवले असल्याची तक्रार दिली. महिलांचा विश्वास संपादन केला. त्या नुसार महिलांनी रक्कम जमा केली.यावेळी अडसूळ यांनी या महिलांना त्यासाठी बुकिंग करण्यासाठी रक्कम अगोदर भरावी लागेल, असे सांगून लाखो रुपये जमा करून घेतले.

### फसलेल्या महिलांचे पैसे मिळवून द्या

अनेक महिने उलटूनही एकाही महिलेला शिलाई मशीन मिळाली नाही. यामध्ये आपण पुरते फसलो असल्याचे महिलांच्या लक्षात आलेत्यावेळी त्यांनी संबंधित व्यक्तीला भरलेले पैसे परत मागितल्यावर त्याच्याकडून उडवा उडवी चे उत्तरे येऊ लागली त्यानंतर टाळाटाळ करण्यात आली. संबंधित पोलीस अधिकारी यांनी यावर कारवाई करून या फसलेल्या महिलांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी मदत करावी.